संगणक ०१३

जा.क्र.आस्था-१/विअ/कंत्राटी नियुक्ती/२०२१
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,
२, साधू वासवानी रोड, जीपीओ शेजारी,
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६२०८३०१
पुणे, दिनांक : ०९/१२/२०२१ / 14139

---

विषय :- पोलीस आयुक्त, पुणे शहर आस्थापनेवर विधी अधिकारी पदे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत....

.....०.....

**संगणक कक्ष प्रमुख, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर**

२/- पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवर विधी अधिकारी ही एकूण ९ पदे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. त्याबाबतची सविस्तर जाहिरात आणि विहित अर्जाचा नमुना सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी सदरची जाहिरात व विहित अर्जाचा नमुना हे पुणे पोलीस आयुक्तालयाचे www.punepolice.co.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

( अमिताभ गुप्ता )
पोलीस आयुक्त, पुणे शहर.

# जाहिरात

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे आस्थापनेवर विधी अधिकारी यांची खालील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पूर्णतः कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी भरावयाची आहेत. त्याकरिता खालील अटी व पात्रता पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन + दूरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १. | विधी अधिकारी (गट-ब) | ०३ पदे | रुपये १५००० + ५०००/- |
| २. | विधी अधिकारी | ०६ पदे | रुपये १२००० + ३०००/- |

**सुचना :-**

१. अर्जाचा नमूना www.punepolice.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२. विहित नमुन्यातील अर्ज पोलीस आयुक्त कार्यालय, साधू वासवानी रोड, जीपीओ शेजारी, कॅम्प, पुणे-४११००१ पुणे शहर येथील नोंदणी शाखा यांचेकडे दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सांयकाळी ०५.४५ वा.) पर्यन्त पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

३. विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन, लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **"विधी अधिकारी (गट-ब)" / "विधी अधिकारी"** पदासाठी अर्ज असे नमूद करावे.

४. दि.३१/१२/२०२१ रोजी सायं. ०५.४५ वा.नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

५. अर्जदाराने अर्जामध्ये स्वतःचा दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व पत्रव्यवहाराचा पत्ता बिनचुक व सविस्तर नमूद करावा.

**अटी व शर्ती :-**

१) सदर पदाची नेमणूक ही तात्पुरती आणि पूर्णतः कंत्राटी पध्दतीची असेल. उमेदवाराला शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर नियुक्ती प्राधिका-यास आवश्यक वाटल्यास करारनाम्याची मुदत जास्तीत जास्त २ वेळा (प्रत्येक ११ महिन्यांनंतर) वाढविता येईल. ०२ वेळा मुदत दिल्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्चः नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्चः निवड प्रक्रीयेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर खाजगी काम/व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यांत येईल व अशा उमेदवारांवर कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

४) उमेदवाराची निवड मुलाखतीव्दारे करण्यांत येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यांत येईल.

५) उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

६) निवड करण्यात आलेल्या उमेदवाराकडून शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात करारपत्र (Agreement ) करुन घेण्यात येईल.

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवारांनी खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३०/११/२०२१ पर्यन्त पुर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत २.५से.मी.X २.५से.मी. आकाराचे सध्या काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

१०) विधी अधिकारी यांच्या नेमणुका या सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र.१९००८-१९००९ महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्र.२०१८२/१२ श्री.नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दि.२/११/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या अंतरिम आदेशाच्या तसेच मूळ याचिका क्र.३४७८८/१२, ३४७७९/१२ तसेच स्पेशल लिव्ह पिटीशन क्र.३६९६५/२०१२ व ३६९६७/२०१२ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून असतील.

<u>करारातील मासिक देय रक्कम.</u>

विधी अधिकारी (गट-ब) पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रु.१५,०००/- आणि दूरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु.५०००/- आणि विधी अधिकारी पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रु.१२,०००/- आणि दूरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु.३०००/- देय राहील. (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

<u>शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा, अनुभव.</u>

<u>शैक्षणिक अर्हता :-</u>

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.
२. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.

<u>वयोमर्यादा :-</u>

विधी अधिकारी (गट-ब) आणि विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

किंवा

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि त्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक सखोल ज्ञान असेल त्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य करण्यांत येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

<u>अनुभव :-</u>

१. विधी अधिकारी (गट-ब) आणि विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान पाच वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
२. उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासकीय अशा प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल, ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

विधी अधिकारी (गट-ब) आणि विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या :-

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-याचे मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन, तदनुषंगाने अपिल दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो सबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९. वरिष्ठ कार्यालयाकडून जे काम करण्याबाबत आदेश दिले जातील त्या कामाची पूर्तता वेळेत करणे. त्याबाबत वेगळे मानधन दिले जाणार नाही.

( अमिताभ गुप्ता )
पोलीस आयुक्त, पुणे शहर.

अर्जाचा नमुना

एक फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा

## विधी अधिकारी पदाकरिता अर्ज

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१. अर्ज क्रमांक :

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक :

३. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासहीत):------------------------------------------------

**सूचना :-** १. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

### अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव

मराठीत :------------------------------------------------------------------------

इंग्रजीत :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :------------------------------------------------------------------------

तालूका :----------------जिल्हा-------------पीन कोड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|

३. कायमचा पत्ता :------------------------------------------------------------------------

तालूका :----------------जिल्हा-------------पीन कोड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|

४. दूरध्वनी क्रमांक- ---------------------भ्रमणध्वनी-----------------------

५. जन्मदिनांक : जन्मस्थळ :-----------------------

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|

६. दिनांक ३०/११/२०२१ रोजीचे वय :

| दि. | | म. | | व. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७. लिंग : पुरुष / महिला

८. धर्म :-----------------------------------जात-----------------------------------

९. क्रिमीलिअर आहे काय : होय / नाही

१० महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय/नाही

योग्य असेल त्या ठिकाणी ( ) खूण करावी.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती:

११.शैक्षणिक अर्हता :-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) | | | | | |
| २.उच्च माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२वी) | | | | | |
| ३.पदवी | | | | | |
| ४.विधी पदवी | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता :

अ) संगणक प्रशिक्षित आहे काय? होय / नाही

ब) प्रत्यक्ष वकीली व्यवसायाचा किती वर्षाचा अनुभव आहे ?

१३.अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याची दिनांक :

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशील

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |

**टिप :- अ.क्र.११, १२ व १३ मध्ये नमुद असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रत अर्जासोबत असणे आवश्यक आहे.**

१४) (अ) अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/ सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परीक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? काढून टाकण्यात आले आहे काय?

१४) (ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?

(१४-अ किंवा१४-ब चे उत्तर होय असेल तर अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषीसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ठ करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/सौ/कु. ---------------------------------------------------------------- याव्दारे प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णतः जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

अर्जदाराची सही
( दिनांकासह )

दिनांक :